**जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष,**
**जिल्हा परिषद, गोंदिया**

**वाहन भाडे ई-निविदा सूचना क्रं.-१**

**ई-निविदा सूचना क्र.- ई-नि/वाहन/५०७/२०१८**
**दिनांक १९/०६/२०१८**

जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन, जिल्हा परिषद, गोंदिया, करीता खालीलप्रमाणे ३ वाहने भाडेतत्वावर घेण्याकरिता ई-निविदा प्रणालीद्वारे https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर दरपत्रक आमंत्रित करण्यांत येत आहे.

**वाहनाबद्दल माहिती**

| अ. क्र. | कार्यालयाचे नांव | वाहनाची आसन क्षमता | संख्या | वाहनाचा प्रकार (A.C. वाहन) | वाहन खरेदी वर्ष | करार कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) जिल्हा परिषद, गोंदिया | ८ ते १० आसन क्षमतेचे वाहन | २ (दोन वाहन) | टाटा, टोयोटा, महिंद्रा, मारोती सुझुकी | ३० जुन २०१५ नंतरचे | ११ महिने |
| २ | पाणी गुणवत्ता कक्ष, राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम, जिल्हा परिषद गोंदिया | ८ ते १० आसन क्षमतेचे वाहन | १ (एक वाहन) | टाटा, टोयोटा, महिंद्रा, मारोती सुझुकी | ३० जुन २०१५ नंतरचे | ८ महिने |

**ई-निविदा वेळापत्रक**

| | |
|---|---|
| ई-निविदा ऑनलाईन प्रसिध्द दिनांक | दि. २०/ ०६/२०१८ |
| ई-निविदा दस्ताऐवज डाऊनलोड प्रारंभ दिनांक | दि. ३०/ ०६/२०१८ |
| ई-निविदा दस्ताऐवज डाऊनलोड समाप्त दिनांक | दि. १६/ ०७/२०१८ सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत |
| ई-निविदा ऑनलाईन दाखल करण्याची सुरुवात दिनांक | दि. ३०/ ०६/२०१८ |
| ई-निविदा ऑनलाईन दाखल करण्याची अंतीम दिनांक | दि. १६/ ०७/२०१८ सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत |
| ई-निविदा ऑनलाईन उघडण्याचा दिनांक | दि. १८/ ०७/२०१८ दुपारी ०१.०० वाजता (अथवा अधिकारी जी वेळ देतील त्या दिवशी) |

१. सदर वाहनाकरिता निविदा (दरपत्रक) फक्त ई-निविदा प्रणालीद्वारेच सादर करावी. टपालाने किंवा हस्ते कोणतीही निविदा स्विकारली जाणार नाही.
२. निविदा प्रपत्राची किंमत रु ५००/- (अक्षरी पाचशे फक्त) व अनामत रक्कम (सुरक्षा ठेव) प्रत्येकी वाहन रु.१०,०००/- (अक्षरी रू. दहा हजार फक्त) मांगपत्र (Demand Draft) द्वारे दि.१८/ ०७ /२०१८ पर्यंत (अंतीम दिनांकापर्यंत) जमा करावयाचे आहे.
३. तुलनात्मक दृष्टिने नवीन वाहनास प्राधान्य देण्यात येईल.
४. T Permit आवश्यक राहील.
५. वाहन हे All India Permit असलेल्या वाहनास प्रथम प्राधान्या देण्यांत येईल.
६. जर निविदा ऑनलाईन भरण्याच्या शेवटच्या दिनांक व वेळेपर्यंत कमी निविदा आलेल्या आढळल्यास निविदा समिती, निविदा भरण्याची मुदत वाढवुन देऊ शकतात, याची निविदाधारकांनी नोंद घ्यावी. ज्या निविदाधारकांनी प्रथत वेळी निविदा भरलेली असल्यास व्दितीय मुदत वाढ दिल्यास त्यांना पुनःश्च निविदा भरण्याची गरज नाही. परंतु काही तांत्रिक अडचणींमुळे निविदा रद्द करण्यात आल्यास सर्व निविदाधारकांनी पुनःश्च निविदा भरावी लागेल.
७. ऑनलाईनमधील BOQ मध्ये दर टाकतांना निविदा सादरकर्त्यांने सर्व करांचा समावेश करूनच दर टाकण्यांत यावे. (उदा. GST, डिझेलचे वाढते दर, इत्यादी). डिझेलच्या वाढत्या दरासाठी अथवा कोण्यत्याही करांचे भुगतान कार्यालय करणार नाही. वाहनाची, वाहनाच्या चालकाची, अपघाताची, करांची सर्वस्वी जबाबदारी ही वाहन मालकाची राहील.
८. कोणतेही कारण न देता निविदा रद्द करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया, यांच्याकडे राखून ठेवले आहेत.
९. अधिक माहितीसाठी वाहन भाडयाने घेण्याबाबतच्या अटी व शर्ती वाचावे.

**टिप :- सदर वाहन हे जाणीव जागृतीसाठी (IEC) म्हणून वापरण्यांत येणार असल्यामुळे वाहन रंगविण्यांत येईल, याची नोंद घ्यावी**

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, गोंदिया**

## जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष, जिल्हा परिषद, गोंदिया
## वाहन भाडयाने वापरण्याबाबतच्या अटी व शर्ती

१. वाहन हे वाहनधारकाच्या /वाहनमालकाच्या/ संस्थेच्या नावावर असणे आवश्यक आहे.

२. वाहन वाहतुक कार्यालयातर्फे वैध नोंदणीकृत व नुतनीकरण झालेले असावे आणि परवाना ग्राहय असावा (कर व विमा ग्राहय असावा) वाहनावरील विमा हा कॉम्प्रेसिव्ह पद्धतीचा असावा.

३. वाहन प्रदुषणमुक्त (पी.यु.सी.) असल्याचा ग्राहय दाखला वाहनासोबत नेहमी असावा.

४. वाहन डिझेलवर चालणारी असावे. वाहनाला लागणारे इंधन (डिझेल तेल इत्यादी) वाहन मालकानेच पुरवावे.

५. वाहनासाठी चालक हा वाहन मालकाने शासन वाहनपरवानाधारक नियुक्त केलेला असावा. वाहनाचा वापर आवश्यकतेनुसार गोंदिया व गोंदिया बाहेर करावा लागेल. उशिरापर्यंत वाहन वापरावे लागल्यास रात्रीकालीन भत्ता किंवा पर्यायी चालकाची जबाबदारी वाहन मालकाकडे राहील.

६. वाहनाचा वापर कार्यक्षेत्राअंतर्गत ग्रामिण भाग, डोंगराळ, अतिदुर्गम भागात सुद्धा होईल.

७. किरकोळ अथवा मोठ्या स्वरुपाची दुरुस्ती करणे ही वाहनमालकाची जबाबदारी राहील. व त्यासाठी किरकोळ दुरुस्तीकरीता एक दिवस व मोठ्या दुरुस्तीकरीता ३ दिवसात मालकास वाहनाची दुरुस्ती करुन द्यावी लागेल. विहित कालावधीत देखभालीसाठी लागणारे फिल्टर, वंगण, मजुरी ई. चा खर्च वाहन मालकास करावे लागेल, तसेच यासाठी झालेला कि.मी. धावसंख्या देयकांत समाविष्ट होणार नाही.

८. वाहन नियमित सुस्थितीत ठेवण्याची जबाबदारी वाहन मालक व चालक यांच्यावर राहील. वाहन सुस्थितीत न आढळल्यास अथवा वाहन चालविण्यांस वाहन चालकाने नकार दिल्यास नियमाप्रमाणे दंडात्मक कार्यवाही (किमान रु.५००/- प्रती दिवस प्रमाणे वसुली) करण्यांत येईल.

९. भाड्याने घेतलेले वाहन, मालकाचे अथवा चालकाचे अकार्यक्षमतेमुळे बंद राहील्यास व त्यामुळे जि.प. व शासनाचे कामकाजावर अनिष्ट परिणाम झाल्यास निर्धारीत कंत्राट ठरल्यानंतर जे प्रती दिवस दर येतील त्याप्रमाणे तेवढ्या दिवसाचे रक्कम देयकातुन कापुन घेण्यांत येईल. भाड्याचे दर सर्व खर्चासह राहतील.या संदर्भात उद्‌भवणाऱ्या कायदेशीर बाबी संबंधी वाहन मालक पुर्णतः जबाबदार राहील.

१०. वाहन चालक कामावर असतांना गणवेश पुरविण्याची जबाबदारी वाहन मालकाची राहील.

११. वाहन हे वाहन मालकाच्या मालकीचे असल्याने वाहन चालकाच्या सर्व नियमबाहय वर्तनास वाहन मालक जबाबदार राहील. (गुन्हेगारी व कायदेशीर बाबींसंबंधी)

१२. वाहन हे सुस्थितीत ठेवण्याची जबाबदारी ही वाहन मालकाची / चालकाची राहील. याकरिता १५ दिवसांना वाहनांची देखरेख व तपासणी आवश्यक असल्यास कार्यालयाच्या सोयीप्रमाणे सुट्टी देण्यांत येईल. परंतु, त्यांचे भाडे कपात करण्यांत येणार नाही. सदर कालावधीसाठी वाहनाची / चालकाची व्यवस्था करणे बंधनकारक राहील व याबाबत २४ तास अगोदर अवगत करणे आवश्यक राहील. वाहनावरील इंधन व दुरुस्ती वा वाहन चालकाचा खर्च (वेतन व प्रवासभत्ते), त्यांच्या राहण्याच्या सोयी वाहन मालकास द्यावे लागेल.

१३. करारनामा केल्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया, तसेच उपमुख्य कार्यकारी अधिकारी, पाणी व स्वच्छता, जिल्हा परिषद, गोंदिया यांनी घेतलेला निर्णय अंतीम राहील व ते वाहन मालकास जबाबदार राहील.

१४. वाहन चालक वारंवार गैरहजर असणे, वाहन चालकाची असमाधानकारक वर्तणुक, निगा, इत्यादी बाबत पर्यायी व्यवस्था मालकास करावी लागेल.

१५. वाहन मालकाने करारनाम्याची अवधी संपण्यापूर्वीच या कार्यालयाला भाडयाने दिलेले वाहन कार्यालयाची पूर्व परवानगी न घेता काढून घेतल्यास त्या महिन्याचे मासिक बिल जप्त करण्यांत येईल.

१६. प्रादेशिक परिवहन अधिकारी (R.T.O.) यांचे नियमानुसार वाहनाची कागदपत्रे वाहनासोबत ठेवावे लागतील. ज्याअभावी प्रादेशिक परिवहन अधिकारी / पोलिस यांनी वाहन थांबविल्यास त्याचे निराकरण करण्याची जबाबदारी वाहन चालकाची राहील. वाहनाच्या कराबाबत (टॅक्स), विमा, इत्यादीबाबत वाहन मालक जबाबदार राहील.

१७. नियमांतर्गत आयकर व इतर तत्सम कर अनुज्ञेय असल्यास त्याची भरणा करण्याची जबाबदारी संबंधित वाहन चालक / मालकाची राहील.

१८. रविवारी अथवा इतर सुट्टयांचे दिवशी सुद्धा आवश्यकतेनुसार वाहन वापरण्यांत येईल. त्या दिवशी चालक व वाहन नेहमीप्रमाणे कार्यालयीन वेळेच्या आत कार्यालयात हजर राहणे आवश्यक आहे.

१९. वाहन एका महिण्यांत जास्त फिरल्यांस ३००० कि.मी. च्या वर प्रती कि.मी मागे येणारा दर हा निविदामध्ये (ऑनलाईन मधील BOQ) वेगळा दर्शविण्यांत यावा. वाहन दि. ३०/०६/२०१५ नंतरचे उपलब्ध न झाल्यास जास्तीत जास्त एक वर्षा अगोदरचे वाहन त्यांची सद्यस्थिती तांत्रिक तपासणी करून त्यांना घेण्याबाबतचा विचार करण्यांत येईल. मात्र ते समितीवर बंधनकारक राहणार नाही.

२०. तुलनात्मक दृष्टीने नवीन वाहनास प्राधान्य देण्यांत येईल. वाहन परवाना असलेली पॅकबॉडी प्राधान्याने व सुस्थितीत वाहन घेण्यांत येईल.

२१. वाहनाचे T Permit आवश्यक राहील.

२२. All India Permit असलेल्या वाहनास प्रथम प्राधन्या देण्यांत येईल.

२३. वाहनांवरील कॉम्प्रेसिव्ह विमा पत्राप्रमाणे वाहनाच्या धंदेवाईक वापरासाठी विमा लागू नाही. सर्व तऱ्हेच्या जोखमीसाठी वाहन मालक / चालक जबाबदार राहील.

२४. वाहन भाडेतत्वावर देण्याबाबतची परवानगी घेण्याची जबाबदारी वाहन मालकावर राहील व जर या बाबतीत कायदेशिर अडचणी उद्भवल्या तर त्याची संपूर्ण जबाबदारी ही वाहन मालक / चालकाची राहील.

२५. वाहन चालकाच्या निष्काळजीपणामुळे वाहनाचे अपघात झाल्यास त्याबाबतचे नुकसान भरपाई ईत्यादीची जबाबदारी वाहनचालकाची व मालकाची राहील.

२६. वाहन हे करारनामा झाल्यापासून १ ते ११/ १ ते ८ महिने या कालावधीकरिता बांधील राहील.

२७. वाहनाचा प्रकार हा दरमहा ३००० कि.मी. किमान मर्यादेचा असेल व वाहनाचा वापर ३००० कि.मी. प्रती माह पेक्षा जास्त झाल्यास ३००० कि.मी. नंतरचा प्रती कि.मी. प्रमाणेचा दर स्वतंत्रपणे BOQ मध्ये ऑनलाईलमध्ये नमूद करण्यात यावा.

२८. वाहन हे करारनामा झाल्यापासून ठरलेल्या कालावधीपर्यंत उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता), जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष, जिल्हा परिषद, गोंदिया, यांच्या अधिनिस्त राहील.

२९. निविदाबाबत निर्णय घेण्याचे सर्व अधिकार अध्यक्ष जिल्हा कार्यकारी समिती तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया, यांना राहतील.

३०. वाहन पुर्ण काळ म्हणजे २४ तास जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष, जिल्हा परिषद गोंदिया या कार्यालयात उपलब्ध राहील व आवश्यकतेनुसार वाहन चालकास वाहन चालविण्याचे बंधन राहील.वाहन चालकास कार्यालयीन वेळेत कार्यालयातच उपस्थित राहायचे आहे. इतरत्र फिरतांना दिसल्यास त्यांच्यावर दंडात्मक कार्यवाही करण्यांत येईल.

३१. कंत्राट मंजुर झाल्यानंतर व वाहन अधिग्रहीत केल्यानंतर वाहन मालकास दर महिन्यास देयके जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष, जिल्हा परिषद, गोंदिया, या कार्यालयाकडे लॉग बुक सोबत सादर करावे लागेल.

३२. कंत्राट मंजुर झाल्यानंतर भरण्यात आलेली अनामत रक्कम सुरक्षा ठेव म्हणून प्रत्येकी वाहन रु.१०,०००/- (अक्षरी रू. दहा हजार फक्त) जमा करण्यात येईल. व रु. १००/- च्या स्टॅंप पेपरवर करारपत्र लिहून द्यावे लागेल. स्टॅंप पेपरवर खर्च कंत्राटदारास करावा लागेल.

३३. वाहनावर शासनाचे निर्देशाप्रमाणे जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष, जिल्हा परिषद गोंदिया अंतर्गत योजनांचे प्रचार व प्रसिध्दी अंतर्गत स्टिकर्स चिटकिवण्यांत येतील, हे वाहन धारकांस बंधनाकारक राहील. त्याचा खर्च या कार्यालया मार्फत करण्यात येईल.

३४. वाहन चालक / मालकाकडुन वाहन बंद करण्यांत आल्यास अमानत रक्कम प्रती वाहन रु. १०,०००/- जप्त करण्यांत येईल.

३५. नियमांतर्गत आयकर व इतर तत्सम कर अनुज्ञेय असल्यास त्याची भरणा करण्याची जबाबदारी संबंधित वाहन चालकाची राहील.

३६. सदर वाहनाच्या निविदेत नमूद करण्यात आलेली प्रती वाहन रू. ५००/- व रू. १०,०००/- चा डिमांड ड्राप्ट दिनांक- १८/०७/२०१८ ला दु. ०१.०० वाजेपुर्वी या कार्यालयास जमा करण्यांत यावा. अन्यथा आपण भरलेली निविदा रद्द करण्यांत येईल. याची नोंद घ्यावी.

३७. भाड्याचे वाहन निविदा प्रक्रिया पुर्ण झाल्यापासुन ११/८ महिने कालावधीपर्यंत घेण्याचे प्रस्तावित आहे. तत्पुर्वी वाहन बंद करावयाचे शासनाचे निर्देश प्राप्त झाल्यावर किंवा शासनाकडुन वाहन प्राप्त झाल्यावर भाडेतत्वावरील वाहन

बंद करुन वाहन मालकाकडे परत पाठविण्यांत येईल. जर त्यानंतर वाहनाची आवश्यकता भासल्यास मुदतवाढ देण्यांत येईल.

३८. वाहन भाड्याने घेतलेल्या कालावधीत वाहनाचे कोणतेही नुकसान / अपघात किंवा वाहनाचे अपघातामुळे प्राणहानी झाल्यास त्याबाबतची कोणतीही जबाबदारी जिल्हा परिषद किंवा शासन स्विकारणार नाही.

३९. वाहन व वाहनचालक यांची काही तक्रार प्राप्त झाल्यास वाहनाचे कंत्राट तात्काळ प्रभावाने रद्द करण्यांत येईल.

४०. एका वाहन मालकाची एकापेक्षा जास्त वाहने असल्यास प्रत्येक वाहनाकरीता स्वतंत्र दर नमुद करुण्यांत यावे. व सर्व वाहनांची कागदपत्रे (उदा. RC/Road Tax/Insurance ect.) ऑनलाईनमध्ये जोडण्यात यावे.

४१. निविदातील कमी दर स्विकारल्यानंतर गाडीची प्रत्यक्ष तपासणी करुन वाहनाची तांत्रिक तपासणी करूनच गाडी भाड्याने घेण्याबाबत संबंधितांना आदेश देण्यांत येईल.

४२. भाड्याने घेतलेले वाहन राज्य शासनाच्या निकषानुसार राहतील व सदरची अंमलबजावणी संबंधित उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता) जि.प. गोंदिया यांचे यंत्रणेखाली राहील.

४३. प्राप्त झालेल्या निविदांपैकी कोणतीही निविदा स्विकारण्याचे अथवा रद्द करण्याचे अथवा सर्वच निविदा कोणतेही कारण न दाखविता (दर्शविता) रद्द करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद गोंदिया व उप-मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता) जि.प. गोंदिया यांचेकडे राखुन ठेवण्यांत आले आहेत. आणि निविदा पाठविणा-या कोणत्याही व्यक्तीला किंवा संस्थेला निविदा फेटाळण्याबद्दल स्पष्टीकरण मागता येणार नाही.

४४. सदर वाहनांची निविदा शासनाच्या www.mahatender.gov.in या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यांत येईल. तसेच निविदेसंबंधीत सर्व शुध्दीपत्रके, अटी व शर्ती, इत्यादी सदर वेवसाईटवर निविदा प्रसिध्द झाल्यानंतर पाहावयास मिळतील.

४५. जर वाहन देखभाल दुरूस्ती करीता देण्यात आल्यास किंवा वाहनाचे चालक अनुपस्थित राहील्यास पर्यायी व्यवस्था करून देणे वाहन मालकास अनिवार्य राहील.

४६. वाहन मालकाची / चालकाची कार्यालयीन दिवशी किंवा कार्यालयीन वेळेत दुसरीकडे वाहन देऊ नये.

४७. वाहनाचे देयकास कधी-कधी दीड ते दोन महिन्याचा कालावधी लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. या कालावधीत सुध्दा वाहन मालकाने आपले वाहन कार्यालयीन कमचा-यांवर निर्भर न राहता स्वखर्चाने नियमितरित्या कार्यालयात ठेवावे लागेल व वाहन सुस्थितीत ठेवणे गरजेचे राहिल.

४६ . वाहन दुरस्तीसाठी होणारी धाव जिल्हा पिरषद कामकाजाच्या धावेत समाविष्ट असणार नाही.

४८. वाहन मालकास मासीक अग्रीम देण्याम येणार नाही.

४९. वाहन ३ वर्षाचे आतील नविन असावे. मात्र ते बंधनकारक राहणार नाही. वाहन महाराष्ट्र राज्यातील असणे आवश्यक राहील. लिफाफा क्रमांक १ तांत्रिक लिफाफ्यामध्ये खालीलप्रमाणे कागदपत्रे सादर करणे आवश्यक राहील.

**a)** निविदा फी ची रक्कम ५००/- डि.डि. व्दारे भरणे आवश्यक राहील. **b)** अमानत रक्कम रु.१०,०००/- डि.डि. व्दारे भरणे आवश्यक राहील.**c)** वाहनाचे टॅक्सी प्रमाणपत्र असणे आवश्यक राहील (T-Permit), **d)** PUC, **e)** पॅन कार्ड, **f)**लायसन्स, **g)** आर.सी.बुक, **h)** इन्सुरन्स, **i)** फिटनेस प्रमाणपत्र, **j)** GST प्रमाणपत्र व GST सह दर भरावे लागेल, GST ची रक्कम अतिरिक्त देय राहनार नाही.**k)** निविदेसोबत दिलेल्या वाहनाचे विवरण प्रपत्र माहिती सादर करणे आवश्यक राहील.

५०. लॉगबुकमध्ये वाहन वापरणाऱ्या मा.पदाधिकारी यांची स्वाक्षरी तसेच प्रवासाचा हेतू याचे नोंदी घेणे आवश्यक राहिल.

**अध्यक्ष**
**जिल्हा कार्यकारी समिती**
**तथा मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, गोंदिया**

# जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष,
# जिल्हा परिषद, गोंदिया
# अंतर्गत भाडे तत्वावर लावणेकरिता अर्जाचा नमुना

## *अर्ज नमुना*

वाहन मालकाचे/ वाहनधारकाचे/ संस्थेचे नांव :-______________________________________________________

__________________________________________________________________________________________________

__________________________________________________________________________________________________

पत्ता :-____________________________________________________________________________________________

__________________________________________________________________________________________________

__________________________________________________________________________________________________

दुरध्वनी/ मोबाईल क्रमांक :- ___________________________ ई-मेल आडी-___________________________

## वाहनाबाबतची माहिती

| अ. क्र. | वाहनाचा प्रकार (कंपनी) | वाहन उत्पादन वर्ष | वाहन खरेदी वर्ष | वाहन क्रमांक | R.C./ T.C. क्रमांक आहे/ नाही | वाहन सीट संख्या | पॅन नंबर आहे/ नाही | वाहन इन्श्युरेन्स आहे/ नाही | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | |

वरी नमूद केल्याप्रमाणे व ऑनलाईनमधील BOQ मध्ये टाकण्यांत आलेल्या दराप्रमाणे आणि सोबत जोडलेल्या शासनाच्या अटी व शर्तीच्या अधीन राहून प्रकल्पास आवश्यक असलेल्या कालावधीसाठी भाडेतत्वावर आपले वाहन उपलब्ध करुन देण्यांस तयार आहे.

**टिप :-**

**१. एक किंवा एकापेक्षा जास्त वाहनांकरिता एकच दर BOQ मध्ये नमुद करावयाचा आहे. वेगळे दर नमुद करता येऊ शकणार नाहीत. एकापेक्षा जास्त वाहन असल्यास निविदा फी व अनामत रक्कमेचा D.D. सुद्धा ऑनलाईनमध्ये अपलोड करावा लागेल व ई-निविदेच्या शेवटच्या दिनांक व वेळेपर्यंत कार्यालयात सादर करावा लागेल.**

**२. जमा करण्यांत आलेल्या कागदपत्रांची शहानिशा केल्यानंतरच वाहन लावण्यांत येईल. त्याआधी वाहनांची तपासणी करण्यांत येईल. त्याकरिता निविदा सादरकर्त्यास फोन अथवा ई-मेल करुन सुचविण्यांत येईल.**

निविदा सादरकर्त्याची/अर्जदाराची स्वाक्षरी